प्रशासकीय कामकाजाचे अधिकार प्रदान करणे बाबत..
" क,क-१ व ड " अभिलेखे नष्ट करणे प्रशासकीय कामकाजाचे अधिकार प्रदान करणे बाबत .

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग -१
जिल्हा परिषद आदेश क्र.साप्रवि-१/र.व.का/ ७२ /२०२५
अहिल्यानगर दिनांक ५ /०३ /२०२५

वाचा:-१.महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनिमय १९६१
२.सहाकार व ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय क्र झेडपीआर-२९६१-२९२९५पी दि.३०/५/१९६४
३.ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. सकिर्ण-२५१७/प्र.क्र.३७२/१७/ आस्था-१दि.३/१०/२०१७

प्रस्तावना-

उपरोक्त संदर्भ क्र.२ नुसार महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (अभिलेख्यांचे वर्गीकरण,परिक्षण व जतन ) नियम १९६४ मध्ये जिल्हा परिषदेचे अभिलेखे वर्गीकरण करणे, जतन करणे,व नष्ट करण्याची प्रक्रिया नमूद आहे. संदर्भ क्रमांक २ व ३ नुसार अभिलेख व अभिलेख कक्षातील अभिलेखे अद्यावीकरणाची मोहिम हाती घेण्यात आली आहे. सदयस्थितीत अभिलेखे ठेवण्यसाठी जागा अपूरी पडत आहे. त्या अनुषंगाने असे निदर्शनास आले आहे की, जुन्या अभिलेख्यांचे निंदणीकरण ब-याच वर्षापासून झालेले नाही, यादया अद्यात नाहीत, अभिलेखे निंदणीकरण झालेनंतर नष्टकरावयाचे अभिलेखे यास विलंब होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

सदयस्थितीत जिल्हा परिषद स्तरावरील विविध विभागातील योजनेच्या कामाचे तसेच विविध आस्थापना,सभा, इ.कामाचे कामाचे स्परुप पाहाता अभिलेख्यांचे निंदणीकरण प्रक्रिया तात्काळ होण्याचे दृष्टीने अभिलेख " क ", " क-१ " , " ड " दर्जाचे अभिलेखे नष्ट करण्याचे अधिकार खातेप्रमुखांना वितरीत करण्याचे विचारधिन होते.त्यानुसार खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

निर्णय-

संदर्भ क्र.१ मधील नियम ९५,९६ अधिकाराचा वापर करुन संदर्भ क्र २ मधील अभिलेखे " क ", " क-१ " ," ड " वर्गाचे अभिलेखे नष्ट करण्याचे अधिकार सोबतच्या जोडपत्रामध्ये नमुद केले नुसार त्या त्या विभागाचे खाते प्रमुख यांना देण्यात येत आहे. सोबतचे जोडपत्रामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर संबंधित खाते प्रमुख यांनी कायदा, नियम व शासनाचे आदेशाच्या अधिन राहून करण्याची दक्षता घ्यावी. सदर अधिकार कोणत्याही वेळी व कोणत्याही कारणाने काढून घेण्याचे अधिकार राखुन ठेवण्यात येत.सदर आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संगणक संकेतांक क्रमांक ---------- ------------------असा आहे. सोबत - जोडपत्र
202503050400033

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 05-03-2025 11:56:44
(आशिष येरेकर, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रती
सर्व खाते प्रमुख, (सर्व)
जिल्हा परिषद अहिल्यानगर

कार्यालयीन कामकाजासाठी अधिकार प्रदाण करणे बाबत.

जोडपत्र आदेश क्र. साप्रवि-१/रवका/७२ /२०२४ दिनांक ५/०३/२०२५

| अ. क्र. | अधिकाराचा प्रकार | कोणत्या प्राधिकारान्वये अधिकार मा.मु.का.अ. यांना अधिकार प्राप्त झाले आहेत. | कोणत्या नियमान्वये सदरचे अधिकार प्रदान करतास येतील ? | अधिकार प्रदान करावयाचा आहे त्या अधिका-यांचे पदनाम | प्रदान केलेल्या अधिकाराची व्याप्ती | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | क, क-१, व ड अभिलेखे नष्ट करण्याचे अधिकार प्रदाण करणे . | १. शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग,परिपत्रक क्रं.टीआरजी-१४६९/सी-८८२९-डी-१ दि.३० सप्टेंबर १९६९ | म.जि.प.व पं.स. अधिनियम १९६१ चे कलम ९६ (१) | १.खाते प्रमुख (सर्व), जिल्हा परिषद अहिल्यानगर संबधित विभागाचे खाते प्रमुख | क, क-१, व ड अभिलेखे नष्ट करण्याचे अधिकार प्रदाण करणे बाबत. | पूर्ण अधिकार (अधिनियमातील नियमाचे पालन करणे बंधन कारक राहील.) |

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 05-03-2025 11:57:18
(आशिष येरेकर, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर